# कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

टोल फ्री क्रमांक - 1064

कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

## :: प्रेस नोट ::

दिनांक :- 25.03.2021.

पंचायत समिती घनसावंगी येथील पाणी पुरवठा विभागातील वरिष्ठ सहायक श्री.विजय मधुकर काळे यांना तक्रारदार यांच्या कडुन त्यांच्या बहिणीचे सुरक्षा ठेव (FSD) चे 11982/- रुपये बिलाची फाईल मा.बिडीओ पंचायत समिती घनसावंगी यांच्या कडुन मंजुर करुन चेक काढण्यासाठी 1,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री.विजय मधुकर काळे वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी वरिष्ठ सहायक पाणी पुरवठा विभाग पंचायत समिती घनसावंगी, रा.वार्ड क्रमांक 8 जाफ्राबाद जि.जालना (वर्ग -3) |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 25.03.2021 रोजी 13.49 वाजेच्या सुमारास पंचायत समिती घनसावंगी येथील गट शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयाच्या समोर लिंबाच्या झाडाखाली |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 1,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचे माझी बहिण नामे श्रीमती मंगल विनायक शेळके ही सन 2015 ते 2020 या काळात मौजे देवहिवरा येथे सरपंच म्हणुन काम करीत होती.मी ग्राम रोजगार सेवक म्हणुन ग्राम पंचायत कार्यालय देवहिवरा येथेच असल्याने माझे बहिणीचे कार्यालयीन कामकाज मीच पाहत असतो.माझी बहिण ही सरपंच असतांना मौजे देवहिवरा येथील दलित वस्ती सुधार पाणी पुरवठा योजने अंतर्गत कामे केलेले आहेत.सदर कामाचे पाणी पुरवठा विभाग पंचायत समिती घनसावंगी येथुन सुरक्षा ठेव (FSD) ची एकुण 11982/- रुपये मिळणे बाकी आहे.सदर रक्कम परत मिळण्यासाठी पाणी पुरवठा विभाग,पंचायत समिती घनसावंगी येथे फाईल दाखल केलेली आहे.

सदरचे दलित वस्ती सुधार पाणी पुरवठा योजने मधील सुरक्षा ठेव (FSD) ची रक्कम 11982/- रुपयाचे बिलाची फाईल मंजुर करुन मा.बिडीओ पंचायत समिती घनसावंगी यांच्या कडुन मंजुर करुन चेक काढुन देण्या करिता पाणी पुरवठा विभाग पंचायत समिती घनसावंगी येथील वरिष्ठ सहायक श्री.विजय काळे साहेब हे मला 1500/-रुपये मागणी करत आहेत सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक 22.03.2021 रोजी लाचेची पडताळणी केली असता वरिष्ठ सहायक श्री.विजय काळे यांनी तक्रारदार यांच्या कडे त्यांचे बहिणीचे मौजे देवहिवरा येथील दलित वस्ती सुधार पाणी पुरवठा योजने अंतर्गत सुरक्षा ठेव (FSD) ची एकुण 11982/- रुपयाचे बिलाची फाईल मंजुर करुन मा.बिडीओ पंचायत समिती घनसावंगी यांच्या कडुन मंजुर करुन चेक काढुन देण्यासाठी 1,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण झाले होते, त्यावरुन दिनांक 25.03.2021 रोजी वरिष्ठ सहायक श्री.विजय काळे यांनी तक्रारदार यांच्या कडुन त्यांचे बहिणीचे मौजे देवहिवरा येथील दलित वस्ती सुधार पाणी पुरवठा योजने अंतर्गत सुरक्षा ठेव (FSD) ची एकुण 11982/- रुपयाचे बिलाची फाईल मंजुर करुन मा.बिडीओ पंचायत समिती घनसावंगी यांच्या कडुन मंजुर करुन चेक काढुन देण्यासाठी 1,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्वीकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने पंचायत समिती घनसावंगी येथील गट शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयाच्या समोर लिंबाच्या झ ाडाखाली येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक श्री.विजय मधुकर काळे वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी वरिष्ठ सहायक पाणी पुरवठा विभाग पंचायत समिती घनसावंगी, रा.वार्ड क्रमांक 8 जाफ्राबाद जि.जालना (वर्ग -3) यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच अँन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.